नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६०/२०१६
बाळकृष्ण सावंत वि. जयवंत सावंत
निशाण क्र. १५९ लगत

**प्रतिवादी क्र. १ चा उलट तपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.आर.नाईक यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

११. माझा जन्म १९४७ साली झाला. हे खरे नाही की, माझा जन्म व शिक्षण मुंबई येथे झाले. माझा जन्म हडपीड येथे झाला. त्यावेळी माझे आईवडील मुंबई येथे राहत होते. माझे शिक्षण ३ री पर्यंत हडपीड येथे झाल्याचा पुरावा मी दाखल करु शकतो. मी सन १९६० मध्ये मुंबई येथे गेलो. तेथे माझे शिक्षण ११ वी पर्यंत झाले. माझ्या शिक्षणात मध्ये खंड पडला नाही. मी सन १९६७ मध्ये पोष्टामध्ये नोकरीला लागलो. त्याबाबतचा पुरावा मी हजर करु शकत नाही. मी पोष्टामधून १९७९ मध्ये निवृत्त झालो. सन १९८७ मध्ये माझे लग्न झाले. त्यानंतर मी महाराष्ट्र कृषीउद्योग विकास महामंडळ मध्ये मी नोकरी करु लागलो. त्याबाबतचा पुरावा मी देवू शकतो. हे खरे आहे की, मी व माझे कुटूंब मुंबईचे रहिवाशी होतो.

१२. हे खरे आहे की, माझे वडील मारुती हे मुंबई पोलीस दलात नोकरी करत होते. ते नायगाव पोलीस लाईनमध्ये राहत होते. हे खरे आहे की, मला सदानंद हा मोठा भाऊ असून माझ्यानंतर चंद्रकांत, सुरेश व सुहासिनी ही जुळी भावंडे, अंकुश, सुनिता चव्हाण व वादी बाळकृष्ण ही लहाान भावंडे आहेत. माझे वडील १९७७ मध्ये पोलीस दलातून निवृत्त झाले. हे खरे आहे की, सदानंद, चंद्रकांत व अंकुश हे पोलीस दलात होते. बाळकृष्ण कोठेही नोकरी करत नव्हता. साक्षीदार स्वतः सांगतो की, तो ट्रान्सपोर्टचा धंदा करत होता. माझे वडील सन १९८६ मध्ये व आई १९८० मध्ये मयत झाली.

१३. दाव्यातील दावा मिळकतीसंदर्भातील महसूली कागद मी पाहिले आहेत. हे खरे नाही की, गिरीजाबाई या अशिक्षीत होत्या. त्या अंगठा करत होत्या. हे खरे आहे की, त्यांच्या पतीच्या मृत्यनंतर दावा मिळकती त्यांच्या नावावर झाल्या होत्या. मी माझा मालकी हक्क दाखविण्याकरीता हजर केलेला कागद हा मृत्यूपत्र आहे. मृत्यूपत्र व बक्षीसपत्र यामध्ये कायदयाने काय फरक आहे हे मी सांगू शकत नाही. मृत्यूपत्र केले तेव्हा मी गिरीजाबाई हिला देवगडला निबंधक यांच्याकडे घेवून गेलो होतो. दस्तात काय लिहायचे याची माहिती दस्त लेखनीकाला मी दिली नव्हती. साक्षीदार स्वतः सांगतो की, गिरीजाबाई हिने दिली होती.

प्रश्न – दस्त झाल्यानंतर दस्ताची मुळ प्रत तुमच्या ताब्यात होती का ..

उत्तर – दोन प्रती होत्या. एक प्रत माझ्याकडे व एक प्रत गिरीजाबाई हिच्याकडे होती.

१४. दावा मिळकतींना माझे नाव लागावे म्हणून तलाठी यांच्याकडे गिरीजाबाई हिने अर्ज दिला होता. दस्तानंतर एक वर्षाने हा अर्ज दिला होता. त्या अर्जावर तलाठी यांनी काय कार्यवाही केली याबाबत मला काही कल्पना नाही. त्याबाबत चौकशीसाठी मी तलाठी यांच्याकडे गेलो होतो. हे खरे आहे की, सन १९८२ मध्ये गिरीजाबाई या मयत झाल्या. हे खरे आहे की, गिरीजाबाई मयत झाल्यानंतर त्यांना सर्व वादी प्रतिवादी हे वारस असल्याबाबतचा अर्ज मी तलाठी यांच्याकडे दिला होता. हे खरे आहे की, त्या अर्जामध्ये मी सर्व मिळकती माझ्या ताब्यात आहेत व गिरीजाबाई हिची देखभाल मी केली असल्यामुळे माझे एकटयाचे नाव लागावे असे लिहिले होते. हे खरे नाही की, त्यावेळी मी बक्षीसपत्राची प्रत तलाठी यांच्याकडे दिली नव्हती. अशी प्रत मी दिली होती व त्याची तलाठी यांनी दखल घेतली होती असे दाखविणारा कागद मी हजर करु शकत नाही. गिरीजाबाई हिच्या मृत्यूनंतर सन १९८७ नंतर मी माझे नाव जयसिंग ऐवजी जयवंत असे राजपत्र केल्याने रेकॉर्ड सदरी लावावे असा तलाठी यांच्याकडे अर्ज केला होता. हे खरे आहे की, गिरीजाबाई हिची मुलगी सुलोचना परब यांच्या सन १९९५ च्या मृत्यूनंतर त्यांचा वारसांची नावे दावा मिळकतींना लागण्यासाठी वारस तपास झाला. हे खरे आहे की, सन डिसेंबर २००० मध्ये मी पहिल्यांचा माझ्या बक्षीसपत्राची नोंद रेकॉर्ड सदरी व्हावी म्हणून तहसिलदार यांच्याकडे दिला होता. हे खरे आहे की, त्याप्रमाण १५४८ नंबरचा फेरफार नोंद झाला. हे खरे नाही की, या फेरफाराची नोटीस मला सोडून इतर कोणत्याही वादी प्रतिवादींना देण्यात आली नव्हती. पुढे वादीने या फेरफारासंदर्भात अपील दाखल केले किंवा कसे हे मला माहित नाही. हे खरे आहे की, फेरफार क्र. १५४८ हा रद्द झाला आहे. हे खरे आहे की, सद्या दाावा मिळकतींना सर्व वादी प्रतिवादींची नावे लागली आहेत. हे खरे नाही की, गिरीजाबाई हिच्या मृत्यूपश्चात सर्व दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची सामाईक वहिवाट आहे. हे खरे आहे की, दावा मिळकतीतील सर्व जंगली झाडेआहेत. हे खरे नाही की, त्या झाडांची लागवणे कोणीही केलेली नाहीत. साक्षीदार स्वतः सांगतो की, गिरीजाबाई हिने लागवड केली होती.

१५. हे खरे आहे की, मी सन १९८७ पर्यंत नायगाव पोलीस लाईन येथे एकत्र कुटूंबात राहत होतो. हे खरे आहे की, मी सन १९८२ मध्ये कृषीविभागात पहिल्यांदा चालक म्हणून नोकरीला लागलो. हे खरे नाही की, तो पर्यंत माझा उदरनिर्वाह वडीलांच्या व कुटूंबाच्या कमाईवर होत होता.

१६. हे खरे नाही की, नि. १२६ वरील दस्तावर गिरीजाबाई हिचा अंगठा नाही. हे खरे नाही की, दस्तामध्ये नमूद साक्षीदार हे अस्तित्वात नाहीत. हे साक्षीदार माझ्या ओळखीचे नव्हते. ते देवगडचे राहणारे होते. साक्षीदार मुनीर शेख व निकम असे होते. निकम कोठे राहत होते हे मला माहिती नाही. हे खरे आहे की, अशा नावाच्या व्यक्ती हयात असल्याबाबतचा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. हे खरे आहे की, गिरीजाबाई हिच्या मृत्यूनंतर तिचा अंतिमविधी तुकाराम शिवराम राणे यांनी केला होता.

१७.		हे खरे नाहाी की, सर्व मिळकती माझ्या मालकी व कब्जाच्या आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, गिरीजाबाई हिने प्रेमापोटी मला बक्षीसपत्राने अथवा मृत्यूपत्राने दिल्या हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी सन १९६७ साली पोष्टात नोकरीला लागलो व आजीला मदत होतो हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मनिऑर्डरच्या ज्या पावत्या आहेत त्या माझ्या आईवडीलांनी मला गिरीजाबाई हिला देण्यासाठी दिले होते. हे खरे नाही की, गिरीजाबाई हिने दावा मिळकतीमध्ये झाडांची लागवड केली होती हे मी खोटे सांगत आहे. हे खरे आहे की, गिरीजाबाई हिने लागवड केल्याबाबतचा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. हे खरे नाही की, मी खोटी कैफियत दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

श्रीमती एन.बी.घाटगे

दि. १७/०१/२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.